अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग
पुणे महानगरपालिका
जा.क्र.ई/ १०९२
दिनांक : १४/०७/२०१७.

## बैठक इतिवृत्त

पुणे शहरातील रस्ता, पदपथांवरील बायोमेट्रीक सर्वेक्षणात आढळून आलेल्या व संगणकीय नोंदणी झालेल्या फेरीवाल्यांचे योग्य त्या ठिकाणी पुनर्वसन करणे व त्यांचेकरीता आकारावयाचे दैनंदिन शुल्क निश्चित करणे याकामी दिलेल्या उपसूचनेसह मा. मुख्य सभा ठराव क्र.९६७,दि.२१/०३/२०१६ या ठरावास मा. मुख्य सभेने मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने मा. महापौर, पुणे म.न.पा. यांचे नियंत्रणाखाली अपिलेट कमिटी नेमून विषयांकित प्रकरणी दि.३०/०६/२०१७ रोजी सदर कमिटीची बैठक मा. महापौर, पुणे म.न.पा. यांचे दालनात घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार कार्यवाही करणेबाबत मा. महापौर, पुणे म.न.पा. यांनी खालीलप्रमाणे आदेश दिलेले असून त्याची संपूर्ण कार्यवाही दि,३१/०७/२०१७ पूर्वी करणेबाबत सूचना दिलेल्या आहेत.

| अ.क्र | विषय | झालेली चर्चा | घेतलेले निर्णयानुसार कार्यवाही करणारे खाते |
|---|---|---|---|
| १ | प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयनिहाय फेरिवाला व्यवसायिकांचे बायोमेट्रीक सर्व्हेक्षण करण्यात आलेले असून त्याचा तक्ता सोबत जोडलेला आहे. | प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयनिहाय फेरिवाला व्यवसायिकांचे बायोमेट्रीक सर्व्हेक्षण प्रत्यक्ष जागेवर सर्वेक्षण झालेली संख्या 28245, संगणकीय नोंदणी पुर्ण केलेली संख्या 20297 प्रमाणपत्र वाटप केलेली संख्या 14677 अशी कार्यवाही पुर्ण करण्यात आलेली आहे. | सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय |
| | क्षेत्रिय कार्यालयनिहाय वर्गवारी अ,ब,क,वड ई फेरीवाला व्यवसायिकांचे पुर्नवसन करणेबाबत | यापूर्वी शहरातील फेरीवाल्यांचे प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयनिहाय केलेल्या सर्वेक्षणा अंतर्गत नोंदणी झालेल्या अ, ब व क या वर्गवारीतील सर्व फेरीवाल्यांचे नव्याने प्रत्यक्ष व्यवसाय जागांवर जावून पुन्हा व्यवसाय जागांची व व्यवसायिकाची तपासणी करून यापूर्वी दिलेल्या कागदपत्रानुसार संबंधित व्यवसायिक नमूद जागेवर स्वत: व्यवसाय करीत आहे अगर कसे? याबाबत फेरतपासणी करावी, असे सर्वानुमते ठरले अशी तपासणी करत असताना नोंदणीमध्ये दिलेल्या वर्गवारीनुसार व्यवसाय कालावधी बाबतची खात्री करावयाची आहे. त्यांचेकडील कागदपत्रे तपासणे, उदा. व्यवसायिकाची क - श्रेणी असल्यास सदर व्यवसायिक यापूर्वी केलेल्या बायोमेट्रीक सर्वेक्षण करतेवेळी ३ वर्षापासून व्यवसाय करीत असलेबाबत पुरावे तपासणे. याकामी तफावत आढळल्यास तशा स्वतंत्र नोंदी पुढील कार्यवाहीकरीता घेणे. | |
| | 8 क्षेत्रिय कार्यालयाकडून दराबाबत व जागा निश्चितीबाबत मा. प्रभाग समितीमध्ये मान्यता घेऊन | वरील फेरतपासणीचे कामकाज करताना संबंधित क्षेत्रिय कार्यालय हद्दीमधील यापूर्वी ठरविण्यात आलेल्या फेरीवाल्यांचे पुर्नवसनाकरीताच्या जागांची | सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय |

| | | | |
|---|---|---|---|
| | प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.<br>क्षेत्रीय कार्यालयांची नावे<br>1)औध 2) घोले रोड 3) वारजे-कर्वेनगर 4) कोथरुड 5) ढोले पाटील 6) येरवडा<br>7) सहकारनगर 8) कोंढवा वानवडी | आवश्यकतेनुसार फेरतपासणी करून त्या निश्चित करणे व त्यांचे बाजारभावानुसार फेरीवाल्यांच्या व्यवसायाकरीताचे दैनंदिन शुल्क यापूर्वी मा. शहर फेरीवाला समितीने ठरविलेल्या वर्गवारीच्या दरानुसार निश्चित करून त्यास मा. प्रभाग कमिटीची मान्यता घेणेकरीताचे सविस्तर प्रस्ताव तयार करणे. | |
| | इतर 7 क्षेत्रिय कार्यालयाकडून जागा व दर निश्चितीचा प्रस्ताव 4 दिवसांत सादर करणेबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.<br>क्षेत्रीय कार्यालयांची नावे<br>1)नगर रोड 2)विश्रामबागवाडा 3)टिळक रोड 4) भवानी पेठ 5) धनकवडी 6)बिबवेवाडी<br>7) हडपसर | फेरतपासणीचे कामकाज पूर्ण झाल्यानंतर दि.१७/०७/२०१७ ते दि.२१/०७/२०१७ या कालावधीत ज्या क्षेत्रिय कार्यालयांकडील फेरीवाल्यांचेकरीता नियोजित जागा व त्यांचे दैनंदिन शुल्क निश्चित करणेच्या प्रस्तावांना यापूर्वी मा. प्रभाग कमिटीच्या मान्यता घेण्यात आलेल्या नसतील, अशा क्षेत्रिय कार्यालयांकडील याकामीच्या स्वतंत्र मा. प्रभाग कमिटीच्या बैठकांचे संबंधित पदाधिकारी यांचे बरोबर समन्वय करून आयोजन करावयाचे असून त्यामध्ये वरील प्रकरणीच्या प्रस्तावांना मान्यता घ्यावयाच्या आहेत. अशा बैठकांना उप आयुक्त (अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग) हे स्वत: उपस्थित राहणार आहेत. | सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय |
| | आयत्यावेळचे विषय | | |
| | पुणे शहरातील फेरीवाला व्यवसायिकांचे बायोमेट्रीक सर्वेक्षण करावयाचे राहिलेबाबत. | वरीलप्रमाणे नोंदणीकृत फेरीवाल्यांची फेरतपासणी करीत असताना जर नव्याने सर्वेक्षण न झालेले परंतू सर्वेक्षण करणेकरीता माहे **<u>डिसेंबर २०१६</u>** पूर्वी क्षेत्रिय कार्यालयाकडे अर्ज दिलेले व्यवसायिक किंवा ब-याच वर्षापासून व्यवसाय करीत असलेले परंतू सर्वेक्षणाकरीता मागणी न केलेले व्यवसायिक अथवा अधिकृत परवानाधारक इ. व्यवसाय करताना आढळल्यास, अशा व्यवसायिकांची स्वतंत्र रजिस्टरमध्ये आवश्यक त्या संपूर्ण माहितीसह नोंदी घेणे.<br>क्षेत्रिय कार्यालयनिहाय फेरतपासणीचे काम करणेपूर्वी संबंधित प्रभागातील मा. सभासद यांचेशी संपर्क करून संदर्भांकित आदेशानुसार कार्यवाही करत असलेबाबत मा. सभासदांना माहिती देणे, त्यांचे हद्दीतील नोंदणीकृत अथवा नोंदणी न झालेले ब-याच वर्षापूर्वीचे व्यवसायिक यांचे फेर सर्वेक्षणाबाबत चर्चा-विनिमय करून पुढील कार्यवाही करावी. पुढील कार्यवाही करत असताना अतिक्रमण निरीक्षक/सहा. अतिक्रमण निरीक्षक तसेच संबंधीत परिमंडळ कार्यालयाचे क्षेत्रिय | सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अतिक्रमण निरीक्षक व कनिष्ठ यांनी एकमेकांचे समन्वयाने कामकाज करावयाचे आहे. फेरीवाल्यांचे फेरतपासणीचे काम दि. 15/7/2017 रोजी अखेर पर्यंत पूर्ण करावयाचे आहे. | |
| | न्यायालयातील प्रलंबित केसेसबाबत. | पुणे शहरातील फेरीवाल्यांचे व्यवसायिकांबाबत न्यायालयात किती केसेस चालू आहेत, केसेसची सद्य स्थिती काय आहे? तसेच न्यायालयाने कोणते निकाल दिलेले आहेत इ. बाबत सर्व माहिती देण्यात यावी. | अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग |
| | पुणे शहरतील बंदीस्त स्टॉलबाबत | जे स्टॉल् खूप दिवसांपासून कायमस्वरुपी बंद आहेत, असे स्टॉल् उचलून आणण्यात यावेत अशी मागणी मा. महापौर यांनी केलेली आहे. जे स्टॉल खूप दिवसांपासून बंद आहेत त्यांना 6 महिन्यापर्यंत आपण विचारणा करुन उचलून आणण्यात येतील, असा निर्णय घेण्यात आला. | सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय |

वरील निर्णय घेऊन बैठक संपविण्यात आली.

(सौ. संध्या गागरे)
उप आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत

१) मा. महापौर
पुणे महानगरपालिका

2) मा. महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

माहितीसाठी....

3) मा. महापालिका सहाय्यक आयुक्त
सर्व क्षेत्रीय कार्यालय
पुणे महानगरपालिका

पुढील ककार्यवाहीसाठी....